संत चोखामेळा मुला-मुलींचे शासकीय वसतिगृह, नागपूर येथील अस्तित्वातील असलेली इमारत पाडून त्या ठिकाणी १००० क्षमतेच्या नवीन मागासवर्गीय मुला-मुलींच्या शासकीय वसतिगृहाच्या इमारत बांधकामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांक: बीसीएच-२०१३/ प्र.क्र.३६/ बांधकामे
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १९ सप्टेंबर,२०१९.

<u>वाचा</u> :-
१) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. बीसीएच-२००५/ प्र.क्र.५५४/मावक-४, दि.२८/६/२००७
२) सभापती, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांचे पत्र क्र. का.अ.(प्र)/९८०६, दि.४/१/२०१६
३) शासन ज्ञापन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.बीसीएच-२०१३/प्र.क्र.३६/बांधकामे, दि.३१/३/२०१६
४) शासन शुध्दीपत्रक सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. बीसीएच-२०१३/ प्र.क्र.३६/बांधकामे, दि.३/२/२०१८
५) शासनाचे पत्र क्र. बीसीएच-२०१९/प्र.क्र.१६०/बांधकामे, दि.२२/८/२०१९ रोजीच्या पत्रासोबतचे, दि.४/७/२०१९ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.
६) दि. ९/९/२०१९ रोजीचे उच्चाधिकार सचिव समितीच्या बैठकीतील निर्णय.

<u>प्रस्तावना</u> :-

संत चोखामेळा मुला-मुलींचे शासकीय वसतिगृहाच्या जागेवर अस्तित्वातील बांधकाम तोडून त्या ठिकाणी १००० मुला-मुलींची नवीन शासकीय वसतिगृह इमारत बांधण्याचे प्रस्तावित आहे. त्यानुषंगाने संदर्भ क्र. ३ येथील विभागाच्या दि. ३१/३/२०१६ रोजीच्या शासन ज्ञापनान्व्ये १००० क्षमतेच्या नवीन मागासवर्गीय मुलांच्या नागूपर येथील शासकीय वसतिगृहाच्या इमारत बांधकामाच्या अंदाजपत्रकास रू.५८,४२,४५,९९९/- (अक्षरी रूपये अठ्ठावन्न कोटी बेचाळीस लक्ष पंचेचाळीस हजार नऊशे नव्यान्नव फक्त) इतक्या रकमेच्या प्रस्तावास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली होती. तद्नंतर संत चोखामेळा मुला-मुलींचे शासकीय वसतिगृह, नागपूर येथील अस्तित्वातील इमारती बांधकाम तोडून त्याठिकाणी नवीन वसतिगृह इमारत अनुषंगिक बांधकाम करण्याबाबतचा प्रस्ताव नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नागपूर यांचेकडून शासनास प्राप्त झाला आहे. सध्या अस्तित्वातील असलेले इमारत तोडण्यास दि. ४/७/२०१९ रोजी झालेल्या बैठकीत मा.मुख्यमंत्री महोदयांनी मान्यता दिली असून याबाबत उच्चाधिकार सचिव समितीने दि.९/९/२०१९ रोजी झालेल्या बैठकीत अस्तित्वातील बांधकाम तोडून त्या ठिकाणी नवीन शासकीय वसतिगृह बांधकाम करण्याबाबतच्या प्रस्तावास मंजूरी प्रदान केली आहे.

सबब दि. ३१/३/२०१६ रोजी निर्गमित करण्यात आलेले शासन ज्ञापन या शासन निर्णयान्वये अधिक्रमित करण्याचा बाब विचाराधीन आहे. त्यानुषंगाने संत चोखामेळा मुला-मुलींचे शासकीय वसतिगृहाच्या जागेवर अस्तित्वातील बांधकाम तोडून त्या ठिकाणी १००० मुला-मुलींची नवीन शासकीय वसतिगृह इमारत बांधण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :-

दि. ३१/३/२०१६ रोजीचे शासन ज्ञापन व दि. ३/२/२०१८ चे शुध्दीपत्रक अधिक्रमीत करून संत चोखामेळा मुला-मुलींचे शासकीय वसतिगृहाच्या जागेवर अस्तित्वातील बांधकाम तोडून त्या ठिकाणी १००० मुला-मुलींची नवीन शासकीय वसतिगृह इमारत बांधकामाच्या रू.७४८६.६४/- लक्ष (अक्षरी रूपये चौऱ्याहत्तर कोटी शहाऐंशी लक्ष चौसष्ट हजार फक्त) इतक्या रकमेच्या प्रस्तावास खालील अटींच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

अटी व शर्ती :-

अ) काम सुरू करण्यापूर्वी नमुना नकाशा, मांडणी नकाशा तसेच विस्तृत नकाशास वास्तुविशारदांकडून मंजूरी घेऊनच सुरू करावे.

ब) ढोबळ स्वरूपात धरण्यात आलेल्या तरतूदीबाबत काम करतेवेळी विस्तृत अंदाजपत्रक करून काम हाती घ्यावे.

क) प्रत्यक्ष काम करतेवेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र. इएनव्ही-२०१३/ प्र.क्र.१७७/तां.क.१. दि. १० जानेवारी,२०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

ड) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासन निर्णय क्रमांक बीडीजी २०१७/ प्र.क्र.६०/इमारती-२, दि.७/७/२०१७ अन्वये कार्यवाही करण्यात यावी.

इ) उपभोक्ता विभागाच्या वतीने प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग, नागपूर यांचे साक्षांकन आवश्यक आहे.

ई) नियोजित जागा उपभोक्ता विभागाच्या ताब्यात असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त करून सदर कामाच्या निविदा सूचना प्रसिध्द करण्यात याव्यात.

उ) नागपूर सुधार प्रन्यासचे प्राधिकृत वास्तुशास्त्रज्ञ यांच्याकडू नकाशा तयार करून नागपूर सुधार प्रन्यासने नकाशे मंजूर करावे.

ऊ) मुख्यवास्तुशास्त्रज्ञ यांनी मंजूर केलेल्या टाईप प्लॅननुसारच सदर बांधकाम येत असल्याचे ते संबंधित यंत्रणेच्या मुख्य अभियंता यांच्याकडून प्रमाणित करण्यात यावे.

ए) नागपूर सुधार प्रन्यास नियोजन प्राधिकरण असल्यामुळे मुख्य अभियंता/अधिक्षक अभियंता, नागपूर सुधार प्रन्यास यांचेकडून अंदाजपत्रकाची तांत्रिक मान्यता घ्यावी.

ऐ) अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर ई-निविदा प्रसिध्द करण्याची कार्यवाही नागपूर सुधार प्रन्यासने करावी व शासनास अवगत करावे.

ओ) संत चोखामेळा मुला-मुलींचे शासकीय वसतिगृहाच्या जागेवर अस्तित्वातील बांधकाम तोडण्याची परवानगी देण्यात येत आहे.

२. विभागाच्या दि. ३१/३/२०१६ रोजीच्या शासन ज्ञापनान्वये उपरोक्त कामास रू.५८,४२,४५,९९९/- (अक्षरी रूपये अठ्ठावन्न कोटी बेचाळीस लक्ष पंचेचाळीस हजार नऊशे नव्यान्नव फक्त) इतका निधी नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांच्या अधिनस्त ठेवण्यात आला आहे.. या कामाकरीता लागणारा अतिरीक्त निधी रू. १६,४४,१८,००१/- (अक्षरी रूपये सोळा कोटी चौरेचाळीस लक्ष अठरा हजार एक फक्त) हा मागणी क्र. एन-४, मुख्य लेखाशिर्ष ४२२५ - अनुसूचित जाती, अनुसचित जमाती आणि इतर मागासवर्ग यांच्या कल्याणावरील भांडवली खर्च,२७७-शिक्षण, पंचवार्षिक योजना अंतर्गत योजना- राज्य योजनांतर्गत योजना (०१)(०३) मागासवर्गीय मुलांमुलींसाठी शासकीय वसतिगृह बांधणे लेखाशिर्ष ४२२५ ०४८१, ५३ - मोठी बांधकामे या लेखाशिर्षाखाली खर्ची घालून सन २०१९-२० या अर्थसंकल्पीय तरतूदीमूधन खर्ची टाकावा.

३. प्रस्तुतचा शासन निर्णय, दि.९/१०/२०१५ च्या शासन निर्णयान्वये गठित समितीस प्राप्त अधिकार तसेच वित्तीय अधिकार, नियम पुस्तिका, १९७८, भाग पहिला, उपविभाग-पाच, अनु.क्र.१ महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेतील परि.क्र.१३४ खाली प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकार तसेच दि. ९/९/२०१९ रोजीच्या उच्चाधिकार सचिव समितीत घेतलेल्या निर्णयास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०९१९१९४०४००८२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Anil Kondaji Ahire

Digitally signed by Anil Kondaji Ahire
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice and Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9004dcdaa635070d60922aaa5dec8888d343a47356798e6c9cf27e4353d60e51, cn=Anil Kondaji Ahire
Date: 2019.09.20 11:57:34 +05'30'

(अ.कों.आहिरे)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.मंत्री (सा.न्या.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
४. मा.राज्यमंत्री (सा.न्या.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
५. आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे.
६. सभापती, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर
७. उपसचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग (इमारती), मंत्रालय,मुंबई
८. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई/नागपूर/पुणे

९. मुख्य अभियंता, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर

१०. कार्यकारी अभियंता तथा समन्वयक, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे

११. प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग, नागपूर.

१२. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग मंडळ, नागपूर

१३. सहायक आयुक्त, समाजकल्याण, नागपूर

१४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परिक्षा), महाराष्ट्र१/२, मुंबई/ नागपूर.

१५. जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर/मुंबई/पुणे